# बायांच्या गुपितांच्या 'वृक्ष-वल्ली'

टिम बिगुल by टिम बिगुल — November 2, 2019 in समाज 0



0
SHARES

Share on Facebook Share on Twitter

- **प्रमोद मुनघाटे**

निसर्गात खूप गुपितं दडलेली असतात. मनुष्य हा निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे. स्त्री आणि पुरुष ही मनुष्याची दोन भिन्न रूपे. पुरुषतत्त्व भोवतालच्या निसर्गापासून स्वत:ला सोडवत दूर जाण्याचा प्रयत्न करते. पण स्त्रीत्वाला तसे करणे शक्य होत नाही. कारण 'जनन' हे स्त्रीत्वाचे वैशिष्ट्य एकूण निसर्गाचेही मुख्य वैशिष्ट्य आहे. स्त्री स्वतःला निसर्गापासून वेगळी समजतच नाही. निसर्गही आपली गुपिते मुक्त हस्ते तिच्यावर उधळत असतो. अट एकच असते, ती गुपितं गुपितंच रहायला हवीत. पुरुषांना त्या गुपितांचा मागमूसही नसतो.

निसर्गाची ही गुपितं वेगवेगळ्या रूपात असतात. अरण्यातील वेगवेगळी झाडे-झुडपे, फुले-फळे व वेली, इत्यादी हे एक असेच रूप. गडचिरोलीच्या जंगलात 'शोधग्राम' मध्ये डॉ. राणी बंग राहतात. तेथील आदिवासींमध्ये त्या आरोग्यसेवेचं काम करतात. सुरवातीला तेथील स्त्रियांची दुखणी कोणकोणती आहेत, ह्याचा त्यांनी शोध घेतला. 'बाळंतपण' हे तेथील बायकांच्या अनेक रोगाचं केंद्र असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बहुतांश रोगांचे माहेरघर म्हणजे स्त्री-पुरुषसंबंध. शेकडो वर्षे झाली तेथील बायका अशा रोगांना कसे तोंड देत असतील, हा मोठाच प्रश्न आहे. ब्याण्णव टक्के स्त्रियांना स्त्रीरोग किंवा गुप्तरोग झालेले आढळले, राणीताईना. लैंगिक जीवनातील प्रश्न, मासिक पाळीच्या समस्या, वंध्यत्व अशा रोगांचे मोठे प्रमाण असूनही फक्त आठ टक्के बायकांनी बाहेरचे वैद्यकीय उपचार घेतल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग इतर स्त्रियांनी काय केले असेल?

या प्रश्नाचा शोध घेताना प्रथमच त्यांच्या लक्षात आले, की निसर्गातील वृक्ष-वल्ली त्यांच्या कानात जे गुपितं सांगतात, ती त्यांच्याच भाषेत असतात. खास बायकांच्या भाषेत. गडचिरोली जिल्ह्यातील बायकांच्या निसर्गातील वृक्ष-वल्लींची गुपितं शोधताना त्यांच्या हाती जे लागलं, ते त्यांनी 'गोईण' या पुस्तकात मांडलेलं आहे. १९९९ साली ग्रंथालीनं प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकाचे उपशिर्षक आहे, 'गडचिरोलीतील स्त्रियांचे झाडाशी नाते'. २०११ मध्ये या पुस्तकाची दुसरी आवृत्ती आली आहे. बाळंतपण करणाऱ्या दाईंना गडचिरोलीकडे 'सुईण' म्हणतात. डॉ. राणी बंग शोधग्राम म्हणजेच 'सर्च' तर्फे तिथल्या सुईणीना प्रशिक्षण देतात. अशाच एका शिबिरात एक गोष्ट घडली. 'गोईण' पुस्तकाच्या मनोगतात ती त्यांनी सांगितली आहे.

" आम्ही इथल्या साठ खेड्यांमधल्या शंभर सईणींचे आरोग्य प्रशिक्षणाचे काम सुरू केले. प्रत्येक महिन्यात दोन ते तीन दिवस प्रशिक्षण शिबिर चालत असे. पहिल्याच शिबिरात दाईसोबत ठरवले , " मी तुम्हाला काही शिकवेन, त्या बदल्यात तुम्ही मला काही शिकवायचं, " सुईणीपण आनंदाने तयार झाल्या. स्त्री – रोगांवरील उपचाराच्या संदर्भात या सुईणींचे प्रशिक्षण सुरू होते. त्यामुळे सहाजिकच मी त्यांना म्हटले की, या आजारांवर घरगुती, जडीबुटीचा काय इलाज करतात ते तुम्ही मला सांगा. आणि अशा प्रकारे झाडांवरची चर्चा सुरू झाली. एका शिबिरात ' समुदसोक ' आणि ' बेशरम ' या झाडांविषयी चर्चा सुरू असताना एक सुईण अचानक बोलून गेली, " बाई , या झाडाचा उपयोग नवऱ्याला मारण्यासाठी करता येतो. " हे ऐकून मला धक्काच बसला. ' नवऱ्याला मारण्यासाठी झाडाचा उपयोग ' हे मी पहिल्यांदाच ऐकत होते. मी विचारले, " नवऱ्याला का मारायचं ? " ताबडतोब काही सुईणी म्हणाल्या, " बाई , तो आपल्याला त्रास देत असला, दुसऱ्या बाईसोबत लफुटपणा करत असला, किंवा आपले दुसऱ्या पुरुषासोबत संबंध असले तर नवऱ्याला नाही मारायचं का, बाई? " सुईणी भराभर खुलायला लागल्या . ताबडतोब त्यांनी मला इतरही काही झाडांचा नवऱ्याला मारण्यासाठी कसा उपयोग करता येतो ते सांगितले . अनेकांनी या झाडांचे विविध अन्नप्रकान ( नवऱ्याला मारण्यासाठी ! ) कसे तयार करायचे ते सांगितले. काहीजणींनी अनेक जवळचे किस्से सांगितले की, अमक्या अमक्या बाईने आपल्या नवऱ्याला का व कसे मारले!" यातील काही सुईणी वैदू होत्या आणि त्यात विशेषकरून आदिवासी स्त्रिया होत्या.
बायकांचे हे वृक्ष-वल्लींचे गुपित ऐकून राणीताई हैराण झाल्या. त्यांनी याविषयी डॉ. अभय बंग यांचेशी चर्चा केली. ते म्हणाले, "इथल्या स्त्रियांचं झाडांसोबत एक विशेष वेगळ नातं आहे. आपल्याला झाडांचे फाकेत औषधी, आर्थिक व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून उपयोग माहित आहेत. पण 'स्त्रियांच्या नजरेतून झाडे' याबद्दल बहुतेक कुठेच माहिती नाही. तू याचा अधिक अभ्यास कर." आणि मग 'स्त्रियांच्या नजरेतून झाडे' हा डॉ. राणी बंग यांचा प्रकल्प साकार होऊ लागला.
गडचिरोली जिल्ह्यात जिथे बंग दाम्पत्याची 'सर्च' संस्था आहे, तो आदिवासी परिसर घनदाट वृक्षराजीने संपन्न आहे. या

जंगलात खऱ्या अर्थाने जैवविविधता आहे. जंगलाशी एकजीव होऊन राहणाऱ्या आदिवासी आणि गैरआदिवासींना तेथील जंगलाची वेगळी अशी जाणीव नाही. कारण त्या जंगलातील जीवजंतूप्रमाणे ते जंगलाचाच एक भाग बनून जगतात. त्यामुळे त्यांचे जैविकच नाही तर भावजीवन सुद्धा झाडाझुडपांनी व्यापलेले आहे. प्रत्येक झाड एका स्वतंत्र व्यक्तीप्रमाणे त्यांच्याशी जणू बोलतो. त्यांची सगळी गुपितं जाणतो आणि जपतो.

विशेषतः स्त्रियांशी या झाडांचे नाते विविध प्रकारचे आहे. झाडं, त्यांची पाने-फळे-फुले, कंद आणि मुळ्या या बायकांच्या जणू माहेरच्या सखी आहेत. त्यांची सुखदु:ख ही झाडं ओळखतात आणि दु:खावर हळुवार उपचार पण करतात. हे उपचार भौतिक असण्यापेक्षा मानसिक अधिक असतात. आपल्या वेदना-व्यथा या बायका कोणाला सांगणार? कोण त्यांची दुखणी समजून घेणार आणि उपचार करणार? कारण मुळात ही दुखणी नवरा, कुटुंब आणि भोवतालच्या माणसांच्या प्रवृत्तीमधून जन्माला आली आहेत. या प्रवृत्तीही फार प्राचीन आहेत. या प्राचीन दुखण्यावर फुंकर घालणारी झाडेझुडपे ही मात्र त्यापेक्षा आदिम आहेत. म्हणून तीच या बायकांना समजून घेत असावीत.

स्थानिक स्त्रियांचे झाडांसोबतचे नेमके नाते कसे असते हे समजून घेण्यासाठी डॉ. राणी बंग ह्यांनी सर्वप्रथम भोवतालच्या रानातल्या झाडांची ओळख करून घ्यायला सुरवात केली. त्या बायांच्या मदतीने प्रत्येक झाडाची माहिती नोंदविताना त्या बायांजवळ माहितीची खाणच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणजे एखाद्या झाडाबद्दल जितके खणावे तितके अधिक खोल खोल काहीतरी नवे सापडत गेले. पण त्या झाडांबद्दल सर्वच माहिती सगळ्यांसमोर सगळ्यांना सांगायची नसते, हेही एक बंधन पाळले जात होते. काही सुईणी एखाद्या झाडाची माहिती राणीताईना एकांतात जंगलात त्या झाडाजवळ नेऊन सांगत. जणू काही ते झाड आणि त्या बाय यांचे खास असे ते गुपित होते; जे कुणालाच म्हणजे विशेषतः पुरुषांना तर अजिबातच माहित नव्हते.

झाडांची माहिती गोळा करताना प्रत्येक झाडाची पाने, फुले, साल, मुळे असे वैशिष्ट्य आणि त्यांचे महत्त्व गोळा होऊ लागले. त्या झाडांचे स्वयंपाकात, औषधी म्हणून आणि धार्मिकदृष्ट्या काय महत्त्व आहे ते समजू लागले. काही झाडांचे त्यांच्या जीवनात इतके स्थान होते की त्या झाडांसंबंधी काही प्रचलित गाणी बाया म्हणून दाखवू लागल्या. हा आणखी एक नवीन शोध होता. ते एक लोकसाहित्य तर होतेच, पण गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी-सामान्य बहुजनांच्या समाजमनातील लोकश्रद्धा त्यातून व्यक्त होत होत्या. त्या गीतांमधील अनुभवांचे प्राचीन अनुबंध आणि निसर्गाशी मानवाचे नाते कसे असते, या गोष्टी समाजशास्त्राच्या दृष्टीनेही विशेष अभ्यासाच्या वाटू लागल्या.

एकदा एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात दायींचे शिबीर होते. तेंव्हा एका सकाळी जमलेल्या बाया आणि सुईणी ह्यांची आपसात काहीतरी कुजबुज सुरु होती. चौकशी केली तेंव्हा सुईणी खरी गोष्ट सांगायला लाजत-बिचकत होत्या. गडचिरोली परिसरात उन्हाळ्यात बिडीपत्ता म्हणजे तेंदूपत्ता ( टेंभराच्या झाडाची पाने) गोळा करायला जाणे हा गरीबांचा एक मोठा व्यवसाय असतो. अनेक दिवसच्या दिवस बायामाणसं आपल्या घरापासून दूर या कामासाठी जातात. तर शिबिरातील काही सुईणी बिडीपत्ता गोळा करायला जाणार होत्या, हे इतर बायांना समजले म्हणून त्या सुईणीनां जंगलातून त्यांच्या साठी दोन गोष्टी आणायला सांगत होत्या. एक म्हणजे 'टेंभराचा डिंक' आणि दुसरी गोष्ट म्हणजे 'येल्या साप'.

राणीताई स्वतः स्त्रीरोगतज्ज्ञ असल्याने त्यांनी बायांच्या या गुपितांबद्दल अधिक कुतूहल वाटले. त्यांनी विचारलं, ह्या गोष्टी कशासाठी? तर उत्तर मिळाले, "बाई मुलबाळ होत नसलेल्या बाईला येल्या सरप खायला दिला तर तिला लेकरं-बाळ होतात; आणि टेंभराचा डिंक गुळात मिसळवून खाल्ला तर मूलबाळ होत नाही." अशी माहिती मिळाली. गर्भपात आणि कुटुंब नियोजन हा राणीताई यांचाच प्रांत. त्यामुळे त्यांची चिकित्सा जागृत झाली. त्यांना प्रश्न पडला की खरेच हे शक्य आहे का? असा प्रश्न विचारताच दहा-बारा सुईणी उभ्या राहून म्हणाल्या: "बाई हे तुमचं ऑपरेशन वाटी (कॉपर टी-तांबी), फुगे (निरोध) वगैरे आता आले. आम्ही बाया पूर्वीपासून हा डिंकच खात आलो, पोरं नकोत म्हणून.!"

झाडांचे हे गुपित जंगलातील प्राण्यांनाही अवगत असते. उन्हाळ्यात टेंभराच्या झाडाला हिरवी पालवी फुटते. पण या हिरव्यागार पालवीला रानात चरणारी गुरेढोरे कधीच तोंड लावत नाही. ह्याचे कारण ती पालवी खाल्याने आपण वांझ होऊ अशी भीती प्राण्यांना असते, अशी माहिती तेथील आदिवासी देतात.

अशी गुपितं असलेल्या ‘गोईण’ या पुस्तकाचे मनोगत म्हणजे एक डॉ. राणी बंग ह्यांचा एक ललितरम्य शोधनिबंध होय असे लक्षात येते. गडचिरोलीतील आदिवासी बाया झाडांना आपल्या ‘गोईण’ म्हणजे मैत्रिणी मानतात. राणीताई लिहितात, “झाडांची माहिती घेत असतानाच काही जाणकार सुईणींसोबत जंगलात जाऊन आम्ही झाडे ओळखू लागलो. या वेळी लक्षात आले की , ग्रामीण बाईचे झाडांशी एक वेगळे नाते आहे. तिच्या दृष्टिकोनातून, त्या नात्यातून, ही झाडे बघितली तेव्हा नवेच रंग दिसले. तिचे व तिच्या संसाराचे पोट, चूल, औषधे, पाणी, बरेचसे या झाडांवर अवलंबून आहे. म्हणून या बायांचे झाडांसोबत एक भावनिक नाते पण निर्माण झाले. बायांच्या जीवनातील व्यथांवर सीतेच्या नावाने कथा आहेत. सीता म्हणजे सार्वकालिक स्त्री ! भाऊ -बहीण, आई-वडील व मुलगी, पत-पत्नी, सून व सासू, सून व सासरे, वहिनी व दीर, प्रेयसी व प्रियकर अशा विविध संबंधांत झाडांसोबत नाजूक नाते जुळलेले दिसून येते.”

मोहाच्या झाडाला झाडीपट्टीत (झाडीपट्टी म्हणजे पूर्वविदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया हे जिल्हे) ‘कल्पवृक्ष’ म्हणतात. मोहाची दारू बनते आणि तिचे व्यसन लागते, हीच गोष्ट या झाडाबद्दल प्रचलित आहे. पण या झाडासंबंधी आणखी बऱ्याच गोष्टी राणीताईंनी या पुस्तकात सांगितल्या आहेत. लोकांचे खाद्यान, रोजगार देणारे, झाडाच्या प्रत्येक भागाचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होतो, हे तर आहेच. पण तेथील स्त्रियांच्या भावजीवनाशी आणि आरोग्याशी मोहाच्या झाडाचे कोणते नाते आहे, ही माहिती थक्क करणारी आहे.

मोहाच्या झाडाबद्दल ‘एक महू त्याचे प्रकार बहु!’ अशी म्हणच झाडीत प्रचलित आहे. “मोहा आमचा मोठा देव आहे, माऊली आहे,आमचे अमृत आहे” असे लोक सांगतात. झाडीपट्टीत गावागावात ग्रामदेवता म्हणजे माऊल्या. गावशीवेवर एका छोट्या मांडवाखाली या लाकडी माऊल्या असतात. लोक नवस बोलतात आणि तो पूर्ण करण्यासाठी मोहाच्या लाकडाची माऊली करून तेथे ठेवतात. लग्न किंवा धार्मिक कार्य असले तर गावातील बाया सर्वप्रथम या माऊल्यांची पूजा करतात. मोहाचे खाण्याचे पदार्थ तर खूपच आहेत. तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे. भाजी, बोंड, पुऱ्या, पुरणपोळी आणि कित्येक पदार्थ मोहाच्या फुलापासून बनवतात. पण मोहाच्या पानापासून बनविलेल्या पत्रावळी व द्रोणाला ग्रामजीवनात आणि धार्मिक कार्यात विशेष महत्व आहे.

मोहाचे फूल हे गरोदर आणि बाळंत बाईला पहिला आधार असतो. मोह गरम असतात यामुळे त्याचे पथ्य नसते. मोहाच्या फळाला ‘टोळ’ म्हणतात. त्यापासून तेल काढतात. ते नारळाच्या तेलासारखे खाण्यासाठी व केसाला अंगाला लावायलाही वापरतात. तर ‘गर्भ उतरविण्यासाठी’ म्हणजे गर्भ पाडण्यासाठी टोळीच्या बिया आणि रुईचे दुध एकत्र करून, त्याच्या कांड्या गर्भाशयात टाकतात. बाळंतीणीचा गर्भ बाहेर आला असेल तर मोहाच्या फुलांनी तो आत दाबतात. बाळंतपणात बाया मोहाच्या फुलांची घडी घेतात. त्यामुळे उब राहते आणि घाण रक्त निघून जाते.

बाळंत बाईला उब यावी म्हणून मोहाची थोडी दारू पाजली जाते. घरच्या घरी अशी दारू तयार केली जाते. मोहाची फुले दोन-तीन दिवस मडक्यात पाणी घालून मोहाची फुले भिजवतात. पिंपात ओतून ते पिंप मातीच्या चुलीवर मांडतात.लोखंडी नळीतून एका शिशीत वाफ बाहेर काढतात. ही वाफ थंड झाल्यावर त्याची दारू तयार होते. बाळंतीण बाईला पोटदुखी असेल तर ‘जिंदा तिलीस्मात’ मध्ये भिजवलेली फुले टाकून देतात.
स्त्रीचे सृजन आणि मोहाची दारू ह्याचे किती घट्ट नाते असते ते सांगताना राणीताई लिहितात, “बाळंतपणात वार पडल्यावर त्याच खोलीत खड्डा खणून त्यात वार गाडतात. गाडताना त्यात थोडीशी मोहाची दारू टाकतात. तसेच ‘बाज काढताना’ ( बाळंतपणानंतर पाचव्या-सहाव्या दिवशी आई – लेकराना आंघोळ घालून , शुद्धी करून बाळंतपणाच्या खोलीच्या बाहेर आणतात) वार गाडलेल्या जागी हळद, कुंकू, तांदूळ टाकून, भाताचा ‘ निवद ‘ ( नैवेद्य ), ‘दावून ( दाखवून ), पूजापाती

करतात व नंतर त्यावर भाताचे दिवे ठेवतात. बारशाच्या दिवशी त्यावर गाडलेल्या ठिकाणा समोरची जागा सारवून त्यावर तांदूळ टाकून त्यावर हळद-कुंकू टाकून पूजा करतात व त्यावर थोडीशी मोहाची दारू टाकतात. मोहाची दारू टाकणे आवश्यक असते.

बारशाच्या दिवशी मोहाची पत्रावळ करून त्यावर भाताचे तीन दिवे मांडतात. बाळंतीण आणि बाळ यांच्या भोवती ते दिवे फिरवितात. काहीजण माझे डोळे त्याला आणि त्याचे डोळे मला येवो’ असे म्हणतात. मग ती दिव्याची पत्रावळ बाजूला ठेवून बरसे सुरु करतात.
गोंडाच्या देवाधर्माला दारू पाहिजेच. कोणतेही काम दारूशिवाय होत नाही. तसा गोंडांचा ‘कायदा’ (रिवाज) आहे.”
“झाडीपट्टीतील आदिवासींच्या लग्नात ‘मांडव डेर’ चा मान मोहाच्या झाडालाच देतात. मोहाची ‘मुंडी’ म्हणजे खांब आणून त्यावर फुले आणि सर्व प्रकारची चित्रे काढली जातात. त्यात चंद्रदेवाचे, सर्प, माणूस, पाखरू, मोर, पान यांचा समावेश असतो. घरासमोर खोदलेल्या खड्ड्यात गाडण्यासाठी फक्त बायाच मुंडी धरून आणतात; कोणतीही बाई-कुमारिका, सवाष्ण, विधवा चालते. बाया मुंडीला नाचवत आणून खड्डयात ठेवतात व मग पुरुष मुंडीला गाडतात. मुंडीसमोर नवरा मुलगा व नवरी यांना बसवून ‘टिका’ म्हणजे टिळा लावतात. तिथेच अक्षताही टाकतात. माराई – देवीकडे नवरी व नवरदेव दोघांनाही नेतात. मोहाच्या पानांचे ‘डोने’ (द्रोण) बनवून, त्याला हळद लावून, त्यात नारळ ठेवून माराईच्या देवाजवळ मांडतात. नवरीच्या घरी मांडवात ‘मायडेर’ (मायच्या नावाच्या फांद्या) हे सालई , मोवई व मोहाच्या या झाडांचे असतात. मायडेर आणणाऱ्या माणसाला दहीभाताची शिदोरी देतात.”

मोहाच्या खालोखाल झाडीपट्टीत महत्त्व आहे ते तेंदू किंवा टेंभरूच्या झाडाला. विड्या बनविण्यासाठी वापरतात तो हाच तेंदूपत्ता. टेंभराचा डिंक हा दुर्मिळ असतो. तो सहसा हाती लागत नाही. सवाष्ण व कुमारिकेने तो हा डिंक कधीच खायचा नसतो. कारण तो खाल्ल्याने पाळी येत नाही आणि मुल बाळ होत नाही. “बाईने डिंक खाल्ला तर ती ‘माणसात मजरा’ (म्हणजे पुरुषी गुणांची) होते, बाई राहत नाही. असे मानले जाते. मोहाच्या झाडाप्रमाणे टेंभराचेही स्त्रीच्या प्रजननक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे.
या संदर्भात राणीताई लिहितात, “बाईचे बाळंतपण झाल्यावर ‘गड्डा’ ( खड्डा ) खोदून दोन टेंभराच्या काड्या व ‘खनती’ (लहान पावशी / विळी) गड्ड्यावर मांडायच्या, एक काडी दरवाज्यात ठेवायची. त्यात एक चप्पल (चामड्याची) ठेवायची. न्हाणीत गड्ढा खोदून बाळंतीण बाईची व लहान लेकराची आंघोळ घालायची व तिथेच अंग-पाय पुसून कपडे नेसायचे. पाचव्या दिवशी बाज काढल्यावर गड्ढा करायचा. संध्याकाळी मग न्हाणी ‘पूंजायची’ (पूजायची). ढीवराच्या (मासेमार) घरची एक ‘काटवा मच्छी’ (काटवा मच्छी हा मच्छीचा एक प्रकार आहे) आणायची घरी ‘दाळ – भात’ ( वरणभात ) शिजवायचा, ‘मोवा’ च्या म्हणजे मोहाच्या पानांची पत्रावळ लावून , त्यावर अन्न ठेवून हळद- कुंकू, तांदळाच्या अक्षता टाकून पूजा करायची. दिवा मांडायचा व मग जेवायचे. बाळंतीण बाईला जास्त भात द्यायचा नाही . ‘रातभर’ तेल टाकून दिवा जळू द्यायचा. त्या दिवशी दिवा विझू द्यायचा नाही ; असा ‘दस्तूर’ च (रिवाज) आहे! टेंभराच्या काड्या , झाडणी , बाळंतीण बाईच्या व सुईणीच्या हातातल्या बांगड्या , सर्व नेऊन ‘ बोडीत ( गावाचा लागलेला असतो ! लहान तलाव ) फेकून द्यायचे. बांगड्या फेकून द्यायच्या, कारण त्याला नऊ महिन्यांत विटाळ लागलेला असतो असा समज आहे.” अर्थात या सगळ्या लोकमानसातील लोकश्रद्धा आहेत. पण विशिष्ट वनस्पती आणि मानवी सृजन यांचे काही आदिबंध यातून प्रकट होतात. धर्मविधी व यातूक्रिया यांचा संबंधही यातून व्यक्त होतो.

‘उंबर’ म्हणजे औदुंबर हे स्त्रीजीवनाशी प्राचीन भावपूर्ण नाते सांगणारे झाड आहे. उंबराच्या खोडापासून जेवायला बसण्याचे पाट बनवितात. उंबराचा चिक म्हणजेच दुध अनेक रोगांवर इलाज म्हणून वापरला जातो. उंबराचा चिक फक्त सकाळीच निघतो. नंतर नाही. उंबराची फळे अमृतासारखी गोड लागतात. सर्वजण-पशुपक्षी आवडीने खातात. जुन्या काळी एखाद्या घरी आपली मुलगी देताना एक परीक्षा असे. ज्या मुलाच्या शेतात उंबराचे झाड आहे, ते स्थळ योग्य मानले जात असे. याचे कारण राणीताई सांगतात की, “मुलीचे आपल्या नवर्याशी किंवा सासूशी भांडण झाले व ती रागाने शेतात गेली किंवा दुष्काळ पडला

तर ती उंबरं खाऊन पोट भरू शकते, तिच्यावर उपाशी राहण्याची पाळी येत नाही."

उंबराशी संबंधित शुभ-अशुभाच्या खूप गोष्टी झाडीपट्टीत आहेत. लग्नाच्या मांडवात एक तरी उंबराची 'डार' म्हणजे फांदी पाहिजे असे मानले जाते. मुली लवकर लग्न व्हावे म्हणून गुरुवारचा उपवास करतात व दर गुरुवारी उंबराच्या झाडाला एकशे एक प्रदक्षिणा घालतात. उंबराबदल आणखी एक समज म्हणजे, उंबराच्या झाडाला लाल रंगाचे फूल लागते. पण ते फक्त भाग्यवान व्यक्तीलाच ते दिसते, इतरांना दिसत नाही. या बद्दल एक सुंदर गाणे या पुस्तकात दिले आहे.

"राम नेते वखर<br>
सीता नेते भाकर<br>
बिनफुलाचा फळ आणशील,<br>
तवा खाशील भाकर."

वनवासात सीता रामाला म्हणाली, "तुम्ही बिनफुलाचे फळ आणा, मगच मी तुम्हाला भाकर देईन. रामाने पुष्कळ शोध घेतला, थकून गेला, राम हरला. मग सीतेने रामाला सांगितले की बिनफुलाचा फळ म्हणजे उंबर! उंबराला फूल येत नाही.

झाड आणि स्त्रीचे भावविश्व ह्यांचे नाते कसे असते, ते डॉ. राणी बंग ह्यांच्या 'गोईण' या पुस्तकातून असे अनेकविध प्रकारे प्रकटते. झाडीपट्टीतील लोकजीवन, तेथील वनस्पती, लोकसमज आणि लोकभाषा ह्याचे एकजीव असे दर्शन या पुस्तकातून घडते. म्हणून हे पुस्तक अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे.

उंबर फोडल्यावर आतून बारीक पाखरे निघतात. ती पाखरे परमेश्वराचाच अवतार आहेत. पाखरू पाहिल्यावर काही लोक मग उंबर खात नाहीत. म्हणून उंबर न फोडताच खाल्ले पाहिजे, असे म्हणतात.

उंबर ओलांडून जाऊ नये असाही समज आहे. रस्त्यात उंबराचे झाड पडले तर एकतरी उंबर जरूर खावे. त्याला टाळू नये, नाहीतर उलटा परिणाम होतो असा आशय असलेली एक गोष्ट या पुस्तकात राणीताईनी सांगितली आहे:

सात बहिणी व एक भाऊ होता. भावाचे नाव होते कोवा. सात बहिणी एकाच गावी दिल्या होत्या. एकदा भाऊ म्हणतो, " मी बहिणींना भेटायला जातो त्यांच्या गावी. " मग कोवा आंघोळ करून चांगले कपडे घालून, कपाळाला गंध लावून उपाशीच हातात थैली व ' लाठी ' ( काठी ) घेऊन निघाला. जंगल-पहाडातून वाट होती. रस्त्यात त्याला तहान भक लागली. जाता जाता जंगलात त्याला उंबरीचा झाड पडला, त्याच्या खाली तो विश्रांतीसाठी बसतो व मनात म्हणतो, " देवा, इतकी तहान-भूक लागली, पण या जंगलात पाणी-अन्न कठे मिळणार! " थोड्या वेळात त्याच्या अंगावर उंबराचे फळ पडले. तो म्हणतो, " हा काय फळ पडला माझ्या अंगावर? " व टाकून देतो. उठतो व परत बहिणीच्या गावाकडे निघतो. उन्हाचे दिवस ! भुकेने तो व्याकूळ झाला. अगोदर मोठ्या बहिणीकडे गेला. भावाच्या कपाळाकडे पाहून ती विचार करते की भाऊ दुसऱ्या बहिणीकडे जाऊन, अन्न खाऊन, आंघोळ करून, कपाळाला गंध लावून आला आहे. त्यामुळे ती भावाशी इतर गोष्टी करते. आई, मुले बरी-आहेत का विचारते. पण जेवणाचे विचारीत नाही. भाऊ पाणी मागतो व दुसऱ्या बहिणीकडे । जातो. तिलाही मोठ्या बहिणीसारखेच वाटते. ती पण-जेवणाचे विचारत नाही. तिथून तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या, सर्व बहिणींकडे तसेच होते. कोणीच त्याला जेवणाचे विचारत नाही व भाऊही काही म्हणत नाही की माझा जेवण झाला नाही. " कर्माची गत न्यारी , अन् काय करेल बुद्धी बिचारी ! " मग कोवा शेवटी सातव्या बहिणीकडे जातो . तिला वाटते , भाऊ सकाळीच आला, सर्व बहिणीकडे जाऊन आला म्हणजे शांतच आहे. तिनेही जेवणाचे विचारले नाही. भाऊ पाणी मागतो व म्हणतो की , आता गावाला जातो . पण चांडाळीण म्हणत नाही की , आज थांब , भाऊ निघाला , जाता जाता परत त्याच उंबराच्या झाडाखाली बसला. म्हणतो, " देवा ! ' मगा ' ( मघा ) फळ पडला तर खाल्ला नाही, आता एकतरी पडू दे ! " पण आता फळ काही पडला नाही आणि भाऊ भुकेने व तहानेने कंठ सोकून ( सुकून ) त्याच झाडाखाली मेला. त्या जंगलात बहिणींच्या गावच्या बाया काड्या गोळा करण्यासाठी आल्या होत्या . प्रेत पाहून सोमी , गोमी गोष्टी करतात , " अरे ! हा कोवा हाय . आपल्या गावात त्या सात श्रीमंत सावकारणी आहेत. त्यांचा हा भाऊ आहे. " मग त्या बाया गावात जाऊन मोठ्या बहिणीला सांगतात, " तुमचा भाऊ आला होता काय? जंगलात उंबराच्या झाडाखाली मरून पडला आहे. " मोठी बहीण मग इतर सर्व बहिणींना जाऊन हे सांगते . साऱ्या बहिणी विचार करतात की , आम्ही कोणीच आपल्या भावाला अन्न-पाणी दिलं नाही, आम्ही वैरीण

! लहान बहिणीचा जीव खूप तडफडतो, ती इतर बहिणींना म्हणते, " तुमच्यामुळे मी कोवाला काही दिलं नाही, " खूप रडते , शोक करते . मग दुधाचा, तुपाचा आंदण मांडून त्यात तांदूळ वैरून खीर करते. गंजात खीर टाकून डोक्यावर मांडून निघते ,' कोवा , कोवा , कोवा ' म्हणत ! उंबरीच्या झाडाखाली जाते व झाडाला म्हणते, " ही खीर माझा भाऊ थोडा जिवंत असेल म्हणून आणली. " भाऊ मेला असे पाहून दु : खाने ती खीर डुंबरात ओतते. डुंबरावर खीर पडल्यावर, डुंबराच्या आतून " फिपुली ' ( पाकळ्या असलेले किडे ) निघतात.
या गोष्टीचे तात्पर्य हे की, उंबराच्या झाडाखालून कितीही श्रीमंत माणूस गेला तरी उंबर खायला पाहिजे व उंबर फोडून खाऊ नये ; आतून फिपुल्या निघतात.

('मुराळी' (गारगोटी, कोल्हापूर) दिवाळी विशेषांक : २०१९, या अंकात प्रसिद्ध झालेला लेख)

**Tags:** Going Rani Bang Tribal women and tree गोईन ताजे

टिम बिगुल

## टिम बिगुल

मुख्य धारेतील प्रसारमाध्यमे सरकारी, राजकीय तसेच कॉर्पोरेट दबावाखाली काम करीत असताना कोणत्याही दबावाशिवाय, स्वतंत्र बाण्याने काम करणारे बिगुल हे मराठीतील पहिले मतपोर्टल आहे. ६ जानेवारी २०१७ पासून मराठीतील नव्या, जुन्या पिढीतील अनेक पत्रकारांच्या सहकार्यातून बिगुलची वाटचाल सुरू आहे. धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांवरचा दृढ विश्वास आणि वाचकांशी बांधिलकी हेच बिगुलचे धोरण आहे. संपादक : राजा कांदळकर

# Leave a Reply

Your email address will not be published. Required fields are marked *

**Comment**

**Name** *

Email *

Website

POST COMMENT

महाराष्ट्राचं
पहिलं
'मत-PORTAL'

महाराष्ट्राचं पहिलं 'मत-PORTAL'
बिगुल
BIgUL

दिवाळीअंक

